प्रजावाणी दि. 15/07/2022

# कुंटूर पोलिसांनी वाचवले सत्तरवर्षीय आजीचे प्राण



रुई (वार्ताहर), दि.१४ : मुसळधार पावसात सर्वत्र जनजीवन विसकळीत झालेले असताना, एका सत्तर वर्षीय वृद्ध महिलेने स्वतःचा जीव देऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. कुंटूर पोलिसांनी तिचे हे प्रयत्न यशस्वी होऊ दिले नाही.

नायगाव तालुक्यातील कुंटूर पोलीस ठाण्याच्याअंतर्गत असलेल्या राहेर येथील गोदावरी पात्रात मुखेड तालुक्यातील पाळा येथील रहिवासी असलेली सत्तर वर्षीय वयवद्ध महिला ही अनाथ झाली असून, तिचा मुलगा गेल्या दहा वर्षाखाली मरण पावला असल्याचे राहेर बिटचे शेख शबीर यांनी सांगितले. सदरची महिला ही मुखेड ते राहेर असा पायी प्रवास करून कुंटूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत आली आणि राहेर ग्रामपंचायतचे सेवक गुलाब नवीसाब यांनी फेरफटका मारीत असताना सदरची महिला आढळून आली. सदरच्या महिलेची चौकशी पोलिसांनी केली असता तिने स्वतःचा जीव देण्यासाठी गोदावरी पात्र राहेर येथे आल्याचे सांगितले. सदरच्या आजी मायला सून असल्याचे पोलिसांनी सांगितले

कुंटूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक महादेव पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली राहेर बिटचे शबीर शेख संतोष आनंदराव शिंदे दुगावकर यांनी सत्तर वर्षाच्या मायीला पुढील आयुष्य पाहण्यासाठी आयुष्य मिळवून दिल्यामुळे जनतेतून कुंटूर पोलीस कौतुक होत आहे.

त्या आजीचे मन परिवर्तन कुंटूर पोलिसांनी करून तिला सुरक्षित ठिकाणी हलविले. त्याच्या नातेवाईक बोलावले आहेत. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उधारी', 'देव तारी त्यांना कोण मारी', ह्या म्हणीप्रमाणे कुंटूर पोलीस प्रामाणिकपणे आपले कर्तव्य बजावताना दिसून आले.